# अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

## महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) नुसार मा.स्थायी समिती सभापती निवडीच्या सभेचे इतिवृत्त.

**--*--**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) ( सुधारणा ) नियम २००८ चे तरतूदी नुसार मा.स्थायी समिती सभापती पदावर सभापतींची निवड करणे साठी दिनांक ०४-०३-२०१४ रोजी बोलाविलेल्या विशेष सभेचे इतिवृत्त.

--*--

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) ( सुधारणा ) नियम २००८ अन्वये मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील आदेश क्र.नपा/१/२/जा.क्र.२४९१/१४ दिनांक २१-०२-२०१४ रोजीचे पत्रान्वये मंगळवार दिनांक ०४-०३-२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता स्थायी समिती सभापती व महिला बालकल्याण समिती सभापती ,उपसभापती पदाच्या निवडीसाठी होणा-या सभेकरीता मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी पिठासीन अधिकारी म्हणून मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना प्राधिकृत केले. त्या अनुषंगाने मा.स्थायी समिती सभापती पदावर सभापतीची निवड करणेकामी बोलविण्यात आलेली मा.स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक ०४/०३/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारतीमधील स्थायी समिती सभागृहात सुरू झाली त्यावेळी मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर हे पिठासीन अधिकारी म्हणून तर खालील प्रमाणे मा.स्थायी समिती सदस्य उपस्थित होते.

| अ.नं. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १ | मा.श्री.संपत विजय बारस्कर |
| २ | मा.सौ.विजया अजय दिघे |
| ३ | मा.श्री.अजिंक्य सुधाकर बोरकर |
| ४ | मा.श्री.चंद्रशेखर बाळासाहेब मारुती बोराटे |
| ५ | मा.श्री.कुमार बबनराव वाकळे |
| ६ | मा.श्री.शेख फैयाज अजिजोद्दीन |
| ७ | मा.सौ.सुनिता महेंद्र कांबळे |
| ८ | मा.सौ.सुनिता दत्तात्रय मुदगल |
| ९ | मा.सौ.शारदा दिगंबर ढवण |
| १० | मा.श्री.उमेश खंडेराव कवडे |
| ११ | मा.श्री.सचिन तुकाराम जाधव |
| १२ | मा.सौ.नंदा मनेष साठे |
| १३ | मा.श्री.दत्तात्रय हरीभाउ कावरे |
| १४ | मा.श्री.किशोर आसाराम डागवाले |
| १५ | मा.सौ.उषा शरद ठाणगे |
| १६ | मा.श्री.दिप नारायण चव्हाण |

सभेच्या कामकाजास सकाळी ११.०० वा. सुरूवात करण्यात आली. सभेच्या सुरूवातीस मा.स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणूकीची विषय पत्रिका सभेमध्ये वाचून दाखविण्यात आली. त्यानंतर नगरसचिव यांनी त्यांचेकडील दाखल नामनिर्देशन पत्रांचे पाकीट समक्ष उघडुन नामनिर्देशन पत्रे मा.पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस सादर केली.

मा.स्थायी समितीच्या सभापतीसाठी एकुण २ उमेदवारांची नगरसचिव यांचेकडे विहीत मुदतीत दाखल झालेली ३ नामनिर्देशन पत्रे मा.पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचेकडे सुपुर्द करण्यात आली. मा.पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांनी ही माहिती उपस्थित सदस्यांना दिली. दाखल झालेले नामनिर्देशन पत्र खालील प्रमाणे.

१) सचिन तुकाराम जाधव
२) सचिन तुकाराम जाधव
३) किशोर आसाराम डागवाले

दाखल झालेल्या नामनिर्देशन पत्राची सकाळी ११.१० वा.छाननी सुरू करण्यात आली.

प्रथमतः १) उमेदवार श्री.जाधव सचिन तुकाराम हे स्थायी समिती सदस्य असुन त्यांची उमेदवारी फॉर्मवर स्वाक्षरी आहे. तसेच सुचक व अनुमोदक हे स्थायी समिती सदस्य असुन त्यांची देखील उमेदवारी फॉर्मवर स्वाक्षरी आहे. त्यांचा पहिला अर्ज मंजूर करणेंत आला. श्री. जाधव सचिन तुकाराम यांनी दाखल केलेल्या दुस-या अर्जावर सुचक व अनुमोदक म्हणुन पहिल्या अर्जावर सुचक व अनुमोदक यांच्याच सह्या असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे ) नियम २००७ चे नियम ५ (२) अन्वये त्यांचा दुसरा अर्ज अवैध ठरविण्यांत आला.

२) उमेदवार श्री.डागवाले किशोर आसाराम हे स्थायी समिती सदस्य असुन त्यांची उमेदवारी फॉर्मवर स्वाक्षरी आहे. तसेच सुचक व अनुमोदक हे स्थायी समिती सदस्य असुन त्यांची देखील उमेदवारी फॉर्मवर स्वाक्षरी आहे. श्री.डागवाले किशोर आसाराम यांचा अर्ज मंजूर करण्यांत आला.

नामनिर्देशन पत्राची छाननी झाल्यानंतर श्री.जाधव सचिन तुकाराम व श्री.डागवाले किशोर आसाराम यांचे उमेदवारी अर्ज वैध असल्याची घोषणा करुन सकाळी ११.१५ ते सकाळी ११.३० वाजेपर्यंत वैध अर्जापैकी ज्यांना उमेदवारी अर्ज मागे घ्यावयाची आहे, त्यांचेसाठी १५ मिनिटांची वेळ देणेत आली.

माघारीसाठीच्या विहीत मुदतीत सकाळी ११.३० वाजताची वेळ संपल्यानंतर स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणूकीसाठी अंतिमतः १) श्री. जाधव सचिन तुकाराम २) श्री.डागवाले किशोर आसाराम या दोन उमेदवारांचे अर्ज शिल्लक राहिले. सदर उमेदवारांची नांवे आडनांवाच्या मराठी वर्णानुक्रमानुसार लावण्यात आली. ती खालील प्रमाणे.

१. श्री.जाधव सचिन तुकाराम.

२. श्री. डागवाले किशोर आसाराम

यानंतर मतदान प्रक्रीया सुरु करण्यांत येत असुन उमेदवाराचे नांव पुकारल्या नंतर त्या उमेदवारास मत देवू इच्छिणा-या सदस्याने हात वर करुन तसेच मतगणका कडील पत्रिकेमध्ये आपल्या नावाची नोंद करुन व स्वाक्षरी करुन आपल्या मताची नोंद करावी. अशा सूचना देण्यांत आल्या.

उमेदवारांच्या यादीनुसार प्रथमतः श्री.जाधव सचिन तुकाराम यांचे नांव पुकारण्यात येत असुन ज्या सदस्यांना त्यांचे बाजुने मतदान करावयाचे आहे त्या सदस्यांनी आपला हात वर करावा व मतदान पत्रिकेवर आपले स्वतःचे नांव टाकुन स्वाक्षरी करावी. असे पिठासीन अधिकारी यांनी सूचविले. त्यानुसार अनुक्रमे श्री.जाधव सचिन तुकाराम  यांच्या बाजुने एकुण उपस्थित सदस्यांपैकी खालील सदस्यांनी मतदान केले.

| अ.नं. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १ | सुनिता दत्तात्रय मुदगल |
| २ | शारदा दिगंबर ढवण |
| ३ | उमेश खंडेराव कवडे |
| ४ | सचिन तुकाराम जाधव |
| ५ | नंदा मनेष साठे |
| ६ | दत्तात्रय हरीभाउ कावरे |

उमेदवारांच्या यादीनुसार दुसरे उमेदवार श्री.डागवाले किशोर आसाराम यांचे नांव पुकारण्यात येवुन त्यांचे बाजुने ज्या सदस्यांना मतदान करावयाचे त्या सदस्यांनी आपला हात वर करून मतदान करणेबाबत पिठासीन अधिकारी यांनी सूचविले. त्यानुसार श्री.डागवाले किशोर आसाराम यांच्या बाजुने एकुण उपस्थित सदस्यांपैकी खालील सदस्यांनी मतदान केले. सदर सदस्यांची नांवे खालील प्रमाणे.

| अ.नं. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १ | संपत विजय बारस्कर |
| २ | विजया अजय दिघे |
| ३ | अजिंक्य सुधाकर बोरकर |
| ४ | चंद्रशेखर बाळासाहेब मारुती बोराटे |
| ५ | कुमार बबनराव वाकळे |
| ६ | शेख फैयाज अजिजोद्दीन |
| ७ | सुनिता महेंद्र कांबळे |
| ८ | किशोर आसाराम डागवाले |
| ९ | उषा शरद ठाणगे |
| १० | दिप नारायण चव्हाण |

श्री.जाधव सचिन तुकाराम यांना ६ मते व डागवाले किशोर आसाराम यांना १० मते प्राप्त झाली.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) ( सुधारणा ) नियम २००८ नियम अन्वये श्री.डागवाले किशोर आसाराम यांना सर्वाधिक म्हणजे १० एवढी मते मिळालेली असल्याने **श्री.डागवाले किशोर आसाराम** हे स्थायी समिती सभापती पदी निवडून आल्याचे पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी घोषीत केले.

सही /-

पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी,
स्थायी समिती सभापती निवड-२०१४.
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर
दिनांक : ०४-०३-२०१४.